फौजदारी कि. अर्ज क्र. ९१/२०१९
रूतुजा वि. विजय
नि. क्र.१५/अर्जदार तर्फे सा.क्र. १

## अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष

### उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री बख्श, वकील यांच्या मार्फत

१. मी माझया माहेरी हिंगणघाट येथे सासर वरून जुलै २०१९ मध्ये आली. तारीख माझया लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की दि. २३.०७.२०१९ रोजी मी महिला समुपदेशन केंद्र येथे गैरअर्जदार विरूध्द तक्रार दिली होती. दि. २३.०७.२०१९ रोजी मी तक्रार देण्याच्या आधी दोन ते तीन महिन्यापूर्वी हिंगणघाट येथे आली होती. हे म्हणणे खरे आहे की दि. १८.०४.२०१९ रोजी मी माझया मुलीसोबत हिंगणघाट येथे आली. हे म्हणणे खरे नाही की दि. १८.०४.२०१९ रोजी ते आजपर्यंत मला गैरअर्जदारा सोबत नांदायचे आहे याबाबतचे मी नोटीस पाठविली नाही किंवा बैठक घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदारासोबत नांदायला जाण्यासाठी त्याला मी नोटीस किंवा पत्र पाठविले नाही. नांदण्यासाठी बैठक घ्यायची आहे याबाबत गैरअर्जदाराला फोन केला होता, परंतु त्यांच्याकडून काहीही उत्तर आले नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हा स्वत: मला नांदावयास घेवून जाण्यासाठी हिंगणघाट येथे आला होता आणि मी व माझया वडिलांनी त्याला घरातुन हाकलून लावले. तारीख माझया लक्षात नाही, परंतु गैरअर्जदार हा माझया घरी दोन वेळा आला होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराने मला त्याच्यासोबत नांदण्यासाठी चल असे म्हटले व मी गेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की गैरअर्जदाराने मला नांदावयास चल असे म्हटलेच नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की नागपूर येथे माझे नातेवाईक राहतात आणि हिंगणघाट येथे राजेश बांडे (जैन) व इतर नातेवाईक राहतात. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराने राजेश बांडे व नागपूर आणि हिंगणघाट येथील इतर नातेवाईकांना असे सांगितले की, मी अर्जदारास नांदावयास तयार आहे तुम्ही तिला समजावून सांगा व त्या नातेवाईकांनी मला त्या संदर्भात फोन केले.

**प्रश्न** माझे लग्न झाल्यापासून ते दि. १८.०४.२०१९ पर्यंत तुम्हाला

गैरअर्जदारापासून त्रास होता याबद्दल तुम्ही कोठे तक्रारी दिली का ?

**उत्तर** नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की मला गैरअर्जदारापासून कोणताही त्रास नव्हता व म्हणून मी त्याच्या विरूध्द कोणतीही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. १८.०४.२०१९ नंतर गैरअर्जदाराने मला फोन केला होता. हे मला आठवत नाही की गैरअर्जदार याने मला दि. १८.०४.२०१९ नंतर फोन करून असे म्हटले की 'तू नांदायला ये, नाहीतर मी नोटीस पाठवील व न्यायालयात केस करेल'. आमच्यामध्ये आमची मुलगी सारक्षी हिच्या शाळेत ॲडमीशन बद्दलची बोलचाल झाली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की मी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, हिंगणघाट येथे गैरअर्जदारा पासून घटस्फोट मिळण्याची याचीका दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदाराने पूणे येथील न्यायालयात मी नांदावयास येण्याबाबत प्रकरण दाखल केले, मी त्या प्रकरणात हजर झाली व माझे लेखी उत्तर दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदाराने पुणे येथील न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणात मी दिलेले लेखी उत्तरामध्ये मी गैरअर्जदारासोबत नांदण्यास नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हा मला व माझया मुलीला नांदावयास आजही तयार आहे.

**प्रश्न** गैरअर्जदार हा आज रोजी तुम्हाला नांदावयास नेण्यास तयार आहे, तुम्ही त्याच्यासोबत जाण्यास तयार आहे काय ?

**उत्तर** नाही, कारण माझया जीवाला धोका आहे.

**प्रश्न** मी महिला संरक्षण अधिकारी हिंगणघाट यांच्याकडे दिलेल्या तक्रारीमध्ये हिंसेबाबत व कोणत्याही घटनेबद्दल तारीख व वेळ नमुद नाही याचे कारण तुम्ही सांगु शकता काय ?

**उत्तर** मी त्यांना तारीख व वेळ सांगितली नाही. परंतु मी त्यांना झालेल्या घटनांबाबत सांगितले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की मी तक्रारी मध्ये नमुद केलेले सर्व आरोप हे खोटे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदारापासून माझा कधीही आर्थिक, शारिरीक व मानसिक छळ झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पूणे येथील न्यायालयात, दिवाणी न्यायालय व. स्तर, हिंगणघाट आणि या

न्यायालयात गैरअर्जदारापासून खावटी मिळण्याकरीता अर्ज दाखल केले आहेत.

६. मी हिंगणघाट येथे आली त्यावेळी माझी मुलगी शाळेत जात होती. हे म्हणणे खरे नाही की माझया मुलीची शाळा बुडत आहे याबाबत मला गैरअर्जदाराने फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदाराने आजपावेतोची माझया मुलीच्या शाळेची फी भरलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया मुलीचा पूणे येथील शाळेत प्रवेश आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया मुलीची शाळा सुरू झाली असून मी तिला शाळेत पूणे येथे पाठवित नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की मी पूणे येथील शाळेत भेट दिली असून माझया मुलीचा प्रवेश नागपूर येथील शाळेत घ्यायचा आहे याबाबत तेथील शिक्षकासोबत चर्चा केली आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की दि. १०.०७.२०१५ रोजी गैरअर्जदार हा मला पूणे येथील मेडी पॉईट रूग्णालयात व समर्थ डायग्नोसीस्ट सेंटर येथे घेवून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की दि. १३.११.२०१८ रोजी गैरअर्जदार हा मुलीला युनीक चाईल्ड केअर व डेंन्टल क्लीनीक येथे घेवून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की आमचे पूणे येथील घराचे वीज देयक हे राहूल कुळकर्णी यांच्या नावाने येते व त्याचा भरणा गैरअर्जदार हा करतो.

**प्रश्न** तुम्ही पूणे येथे राहत असतांना तुमच्या घराचे वीज हे १२० युनीट पेक्षापेक्षा जास्त जळत होते व तुम्ही हिंगणघाट येथे आल्यानंतर १२० युनीट पेक्षा वीज कमी जळत आहे ?

**उत्तर** असू शकते परंतु मला गैरअर्जदार गीझर वापरू देत नव्हते.

८. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदारा विरूध्द खोटी व बनावटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया हिंगणघाट येथील घरात मी, माझी मुलगी, माझी आई व वडील असे राहतो व माझा लहान भाउ हा त्याच्या पत्नीसोबत नागपूर येथे राहतो व माझा मोठा भाउ हा त्याच्या पत्नीसोबत पूणे येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की माझया दोन्ही भावांनी आमच्या कौटुंबीक वादाबाबत कधीही चर्चा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आमचा कौटुंबीक वाद नसल्यामुळे मी त्यांच्यासोबत कधीही चर्चा केली नाही. माझे आई वडील हे म्हातारे असून त्यांची काळजी घेण्याची गरज आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे भाउ हिंगणघाट येथे राहत नाही, त्यामुळे गैरअर्जदार हा हिंगणघाट येथे माझयासोबत माझया आई वडीलांची काळजी घेण्यासाठी राहावा

अशी माझी इच्छा होती. साक्षीदार स्वत:हुन सांगते की माझे आई वडील म्हातारे व रूग्ण आहे हे बरोबर आहे, परंतु त्यांना माझी गरज आहे ही बाब चुकीची आहे, मी येथे राहते म्हणून ते माझयासोबत राहतात. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराने हिंगणघाट येथे राहण्यास नकार दिल्यामुळे मी त्याच्या विरूध्द प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केले आहे.

९. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. या व्यतिरीक्त माझे शिक्षण झाले नाही आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे बी.एड. झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी बी.एड. करीता वर्धा येथील कॉलेजमध्ये ॲडमीशन घेतली होती, परंतु माझे बी.एड. पूर्ण झाले नाही आहे. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदाराला फसविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया वडीलाकडे चारचाकी गाडी आहे. साक्षीदार सांगते की ती गाडी माझया भावाची आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदारापासून पैसे काढण्यासाठी व सुड भावनेच्या उद्देशाने मी गैरअर्जदारा विरूध्द प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केले आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

माझ्या समक्ष, श्रवणोत्तर स्विकृत,

दि. ३०.०६.२०२२

**(दिपक रु. बोर्डे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. ४, हिंगणघाट.